प्रकाशक : जीवनदीप प्रकाशन
कला, वाणिज्य,विधान महाविद्यालय, गोवेली
ता.कल्याण, जि.ठाणे
दूरध्वनी : ०२५१ २३९०९२२२ /२३९०९२८


मुद्रितशोधन : हरेंद्र सोष्टे
मुद्रक :

मुल्ये : २००

"राष्ट्र उभारणीत स्वामी विवेकानंदाच्या विचारांचे योगदान"

संपादक : प्रा.राजाराम वामन कापडी
सहसंपादक : प्रा.रामेश्वर कणसे, प्रा. दौलतराव कांबळे

# "राष्ट्र उभारणीत स्वामी विवेकानंदाच्या विचारांचे योगदान"



संपादक : प्रा.राजाराम वामन कापडी
सहसंपादक : प्रा.रामेश्वर कणसे, प्रा. दौलतराव कांबळे

# राष्ट्रउभारणीत स्वामी विवेकानंदांच्या विचारांचे योगदान


**संपादक**

प्रा. राजाराम वामन कापडी

**सहा. संपादक**

प्रा. रामेश्वर कणसे

प्रा.दौलतराव कांबळे


---


**जीवनदीप प्रकाशन**

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गोवेली, ता.कल्याण,

जि. ठाणे ४२११०३

# राष्ट्रउभारणीत स्वामी विवेकानंदांच्या विचारांचे योगदान


| | | |
|---|---|---|
| संपादक | : | प्रा. राजाराम वामन कापडी |
| सहा. संपादक | : | प्रा. रामेश्वर कणसे, प्रा. दौलतराव कांबळे |
| प्रकाशक | : | जीवनदीप प्रकाशन<br>कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,<br>गोवेली, ता.कल्याण, जि.ठाणे ४२११०३. |
| दुरध्वनी | : | ०२५१ २३९०९२२/२३९०९२८ |
| प्रथमावृत्ती | : | १२ जानेवारी २०१८ |
| मुद्रितशोधन | : | प्रा. हरेंद्र सोष्टे |
| मुखपृष्ठ | : | संदेश शिंगोले, सचिन ग्राफीक्स मुरबाड |
| मुद्रक | : | नैना प्रिंटर्स, नवी मुंबई |
| मूल्य | : | २०० |



© जीवनदीप प्रकाशन


(सदर पुस्तकातील निबंध ही लेखकांची स्वतंत्र विचार अभिव्यक्ती असल्याने त्यातील मजकूराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

**प्रा. नितिन महेंद्र चवरे**
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, किन्हवली

समस्त जगताला कल्याणाचा मार्ग दाखविणारे व विश्वबंधुत्वाची कल्पना कृतीतून साकार करणारे महामानव स्वामी विवेकानंद. यांचे व्यक्तीमत्व म्हणजे भारतभूमीला पडलेले एक सुंदर स्वप्न! पारतंत्र्यात जखडलेल्या भारतीय जनतेच्या मनात भारतीय धर्म, संस्कृती, आचार–विचार परंपरेची ज्योत पेटवणारे, मरगळलेल्या भारतीयांमध्ये चैतन्य निर्माण करून स्वदेश, स्वधर्म, स्वत्वाची जाणीव करून देणारे व भारतीय तत्वज्ञानाची भव्य व उदात्त बैठक सर्व जगाला पटवून देणारे, निसत्व तसेच निरूत्साही भारतीयांना ''उत्तिश्ठत, जागृत स्वःकर्त्यव्यान्निबोधत'' या दिव्य संदेशाने जागे करणारे स्वामी विवेकानंद म्हणजे उर्जेचा अखंड स्त्रोत. 'विवेकानंद' या शब्दातच विवेक व आनंद यांचा अनोखा संगम आहे. यातच प्रेरणा आणि उत्साह आहे. जागतिक किर्ती संपादित केलेल्या या महामानवाने राष्ट्राची उभारणी आपल्या मौलिक विचारांनी केली. समाजातील सामूहिक इच्छाशक्तीच्या बळावर राष्ट्र प्रबल होऊ शकते. असा संदेश विवेकानंदांनी भारतीयांना दिला. आज अशा नेतृत्वाची भारताला आवश्यकता आहे. समाज परिवर्तनाच्या संदर्भात स्वामींनी आधुनिक वैज्ञानिकता व आध्यात्मिकता यांचा सुवर्णमध्य साधला. आपल्या देशाला वैज्ञानिक प्रतिभेची तसेच प्रचंड शक्ती व उत्साहाची गरज आहे. समाजपरिवर्तन व राष्ट्रउभारणीसाठी त्यांनी माणसातील 'मनुष्यत्वाला' आवाहन करून माणूस घडविणे हेच शिक्षणाचे मुख्य ध्येय असे प्रतिपादन केले. चारित्र्यसंपन्न माणसेच राष्ट्राची खरी शक्ती व संपदा असते. राष्ट्रनिर्मितीच्या कार्यासाठी अशा चारित्र्यसंपन्न उत्साही युवकांचे योगदान ही भारताची निकड आहे. असे स्वामीनी आपल्या विचारातून प्रतिपादन केले.

एकोणिसाव्या शतकातील काळ म्हणजे भारताच्या पुनर्निर्माणाचा काळ या पुनरूत्थानाच्या काळात तत्कालीन समाज व्यवस्थेतील अनिष्ठ रूढी परंपरेवर त्यांनी कठोर प्रहार करण्यासाठी राष्ट्रभक्त तरूणांची फळी उभी केली. पाश्चात्यांच्या प्रभावाने त्यांचे अंधानुकरण करण्यात धन्यता मानणाऱ्या उच्च विदयाविभूषीत वर्गाला त्यांनी भारतीय संस्कृतीची महानता पटवून दिली. भारतीय समाजाला स्वाभिमान व

स्वत:च्या आस्मितेचा विसर पडला होता. अशा भौतिकतेच्या मायाजालात फसलेल्या भारतीय समाजाच्या नैतिक उध्दाराचे कार्य स्वामींनी केले.

स्वामी विवेकानंद महान आध्यात्मिक विचारवंत होते. त्यांनी राष्ट्रीयतेला अध्यात्माच्या पायावर उभे केले. भारतीय संस्कृती, सभ्यता, धर्म नष्ट करायला निघालेल्या ब्रिटीशांविरूध्द भारतीय समाजाला एकत्र आणून राष्ट्राची पुनर्उभारणी केली. त्यांनी भारतीयांमध्ये स्वाभिमान व आत्मविश्वासाची ज्योत पेटविली. त्यांचा राष्ट्रीयत्वाचा दृष्टिकोन अध्यात्मिक व मानवतावादी होता. भारतीय संस्कृती व अध्यामिक विचार मानव जातीस मार्गदर्शक आहेत. भारतीय तरूणांना त्यांनी चारित्र निर्मितीसाठी, आध्यामिक एकतेसाठी आवाहन केले. गतकालीन भारतीय वैभवशाली संस्कृतीचा, साहित्याचा, कलेचा या संपन्न वारशाचा त्यांना अभिमान होता. भारतीय लोकांनी भारताची ही अस्मिता टिकवली पाहिजे. त्याकडे आदराने पाहिले पाहिजे. केवळ पाश्चात्यांच्या संस्कृतीमागे आंधळयासारखे धावू नका. भारतीय संस्कृती, सभ्यता, विचार पाश्चात्यांपेक्षाही श्रेष्ठ आहेत. हे जेव्हा तुम्हाला समजेल तेव्हाच तुमच्या उन्नतीला प्रारंभ होईल.

स्वामींनी आपल्या भाषणातून, विचारातून ब्रिटिश सरकारच्या अन्याय्य नीतीवर प्रहार केले. ब्रिटिश लोक भारतीयांच्या कल्याणासाठी आले नसून भारतीय जनतेचे रक्त पिण्यासाठी आले आहेत. ब्रिटिशांच्या आर्थिक नीतीमुळे परिस्थिती खालावली आहे. शिक्षणाचा प्रसार होत नाही, वृत्तपत्र स्वातंत्र्यावरील बंधने यामुळे समाज जागृती होत नाही. त्यांनी साम्राज्यावादाला विरोध करून लोकशाहीच्या उभारणीसाठी प्रयत्न सुरू केले. हा मानवतावाद व्यक्ती व समाज यातील संबंधाशी संबंधीत आहे. जनतेला जागृत करून सामर्थ्यशाली संघटनेद्वारे स्वातंत्र्यप्राप्तीचा मार्ग यशस्वी होऊ शकतो अशी प्रेरणा क्रांतीकारी देशभक्तांस दिली.

राष्ट्राची उभारणी भक्कम पायावर करण्यासाठी सामाजिक ऐक्य महत्वाचे असते. युरोपीय देशांत राजकीय विचारसरणी राष्ट्रीय ऐक्याचा आधार आहे. भारताचा उज्ज्वल भविष्यकाळ बनविण्यासाठी राष्ट्रीय उभारणीसाठी धार्मिक ऐक्याची गरज आहे. सर्व धार्मिक संप्रदायातील उच्च, उदात्त मुल्ये व विचार आत्मसात करून आदर्श समाजजीवनाचा अंगिकार करावा, धर्माला तर्काचा आधार असावा, ती अंधश्रध्दा किंवा कट्टर धर्मांधता

न ठरता सर्वसमावेशक नीती असावी, अंधश्रध्देतून बाहेर येऊन आपल्या संकुचित वृत्तीचा त्याग करून धर्माकडे मानवतेच्या नजरेतुन बघा. विवेकानंदानी वेदांचे तर्कशास्त्रातील रूप जगासमोर आणले आणि त्यांचे भवितव्य भविष्यातील पिढीवर सोपविले. समस्त मानवजातीला एकतेचा संदेश देणे हेच धर्माचे प्रयोजन होय. विवेकानंद सर्व धर्म समभावाचे प्रतिक असुन साप्रंदायिक जातीभेदास त्यांनी विरोध केला.

आपली भारतमाता आपले थोर आराध्य दैवत आहे. समाज हिच आपली देवता आहे.या विशाल भारतीय समाजाची सेवा ही ईश्वरसेवा समजून प्रत्येक भारतीयाने कार्य केल्यास भारतीय जनतेचा सर्वांगीण विकास होईल. माणूस बनविणाऱ्या धर्माची शिकवण स्वामींनी आपल्या विचारातून दिली. धार्मिक कलह बाजूला सारल्याशिवाय सर्व प्रकारच्या सुधारणा करता येणार नाही. सांप्रदायिक मतभेदामुळे शाश्वत धर्मतत्वे संकटात आली आहेत. याबाबत स्वामींनी दिलेला दृष्टांत मार्मिक आहे. जेव्हा रक्त शुध्द व शक्तीशाली असते तेव्हा कोणत्याही रोगाचा प्रतिकार करण्याची क्षमता शरीरात असते. अध्यामिकता हेच आपल्याला जीवन देणारे रक्त आहे. तरच राजकीय सामाजिक व अन्य क्षेत्रातील दोष दुर होतील. समाज परिवर्तन घडविणाचा हा उत्तम मार्ग आहे.

विवेकानंदांनी भारतभर प्रवास करून भारतीय समाजाची दु:स्थिती पाहिली. विश्व भ्रमण करतांना विवेकानंदांचे अखंड चिंतन सुरू असे. आपल्या पवित्र मातृभूमीच्या उत्कर्षासाठी ते अस्वस्थ होत असत. देशातील दारिद्र्य, निरक्षरता पाहून ते नाराज होत असत. त्यांच्या असे लक्षात आले की, आपण भारतीय कूपमंडूक वृत्तीने आपल्या कोशात अडकून पडलेले आहोत. धर्माच्या नावाखाली आपण प्रवास नाकारल्याने सांस्कृतिक, वैचारिक आदान प्रदान खंडित झाली आहेत. उघडया डोळयांनी जग पाहावे, जगातील इतर राष्ट्रांनी कशी प्रगती करून घेतली आहे हे पहावे. जपानने अल्पावधीत केलेली प्रगती पाहून भारतीय समाजाने बोध घ्यावा, असे स्वामी आपल्या भाषणात सांगत.

‘केल्याने देशाटन पंडित मैत्री सभेत संचार
शास्त्रग्रंथ विलोकन मनुजा चातुर्य येतसे फार

स्वामी म्हणत, ‘‘ज्याला जगासाठी काही करायचं आहे. त्याने जग जाणून घेतले पाहिजे आणि ज्याला जग जाणून घेतले आहे त्याने जग

पाहिले पाहिजे आणि ज्याला जग पाहायचे आहे त्याने जगभर फिरले पाहिजे. प्रवास ही मानवी विकासातील महत्वपूर्ण बाब आहे. हे स्वामींनी ओळखले होते. मला जर एकाच ठिकाणी चिटकून राहणे भाग पडले, तर माझे मरण ओढवेल असे स्वामींना वाटे. देशाटन पर्यटनाने अंगी चतुरता पांडित्य येते. राष्ट्रीय एकात्मता वाढीस लागते स्वामी म्हणतात, ''माझ्याकडे जर भरपूर पैसा असता, तर मी भारतातील एक हजार तरूणांना जग प्रवासाला पाठविले असते.''

राष्ट्रीय उभारणीसाठी विविध समस्या पाहून स्वामींनी आपले लक्ष माणूस घडविण्यावर केंद्रित केले. शेवटी राष्ट्र ही केवळ भौगोलिक संकल्पना नाही किंवा निर्जीव वस्तू नाही माणसाचा संघ किंवा समुदाय म्हणजे राष्ट्र. कोणतेही राष्ट्र प्रगत होण्यासाठी तेथील माणूस घडविणे महत्वपूर्ण असते. स्वामींनी मनुष्यातील माणसाला आवाहन केले. कोणत्याही शिक्षणाचे ध्येय माणूस घडविणे हेच असावे. मानवी मनातील पशूवृत्तीचा नाश करून माणूसकीचा अविष्कार घडविते तेच खरे शिक्षण, जे मन, मेंदू व मनगट यांना मजबूत करते. सर्वच ज्ञान माणसाच्या अंतरंगात असते. त्यावर फक्त अज्ञानाचे पटल आलेले असते ते दूर करून पूर्णत्वाचा अविष्कार घडविणे म्हणजे शिक्षण. शिक्षण सर्वांना मिळाले पाहिजे स्त्रियांनाही पुरूषाबरोबरीने अधिकार व शिक्षण मिळाले पाहिजे. स्त्रीयांकडे दुर्लक्ष करून राष्ट्राची प्रगती कधीच होणार नाही. शिक्षणाने व्यक्ती चारित्र संपन्न व्हावी, इच्छांना योग्य दिशा देऊन त्यांचे सामर्थ्य वाढविणे म्हणजे शील संर्वधन करणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट असावयास हवे. स्वामीजी शिक्षणात व जीवनातही शीलाला महत्व देतात. शिक्षणाने आंतरिक विकास होऊन जीवनातील संकटाना व संघर्षांना समर्थपणे तोंड देता येते.

विवेकानंदांनी स्वातंत्राचा पुरस्कार केला जीवन विकासात आवश्यक व महत्वपूर्ण बाब म्हणजे विचार व आचार स्वातंत्र्य, जर मानवाला स्वातंत्र्य नसेल तर त्याचे पतन अटळ आहे. मानवाला व्यक्तिगत विकासासाठी व सामाजिक उन्नती करिताही स्वातंत्र्य ही संकल्पना महत्वपूर्ण आहे. समाजातील सर्व घटकांना शिक्षण, संपत्ती मिळवण्याचा अधिकार व आपली उन्नती करण्यास मोकळीक असावी. जर या बाबतीत त्यास मुभा नसेल तर मानवी विकासातील पारतंत्र्यता हाच मोठा अडथळा ठरेल.

सामाजिक विकास प्रकियेत अडथळा आणणाऱ्या या सर्व बाबींचे उच्चाटन केल्याशिवाय राष्ट्र उभारणी होणे शक्यच नाही.

स्वामी स्वातंत्र्याबरोबर समतेचा पुरस्कार करतात. त्यांस मनुष्या—मनुष्यातील भेदभाव मान्य नव्हता. सर्व शक्तीमान आत्म्याची आपण रूपे आहोत. त्यांनी आध्यात्मिक पूर्णतेचा सिध्दांत मांडला. त्यांची समतेची कल्पना पूर्णपणे समाजवादी होती. त्यांनी सर्वांना समान संधी दिली. पाहिजे या विचाराचे समर्थन केले. त्याची समतेची कल्पना शुध्द बंधुभाव व प्रेमावर आधारित आहे. म्हणूनच ती सार्वभौम आहे.

पाश्चात्य शिक्षण व संस्कृतीने प्रभावित झालेल्या युवकांचा मोठा वर्ग सामाजिक सुधारणा करण्यासाठी पुढे येत होता, परंतु अशा प्रकारच्या सुधारणांनी काही भक्कम घडेल असे स्वामींना वाटत नव्हते. लोकांना विश्वासात घेऊन परिस्थिती व त्यासंबंधी त्यांची कर्तव्य याविषयी लोकात जागृती करून आवश्यक सुधारणा घडवुन आणता येतील. असा त्यांचा विश्वास होता. त्याची समाज सुधारण्याची ही पध्दत रचनात्मक होती. समाजातील दोष दूर करायचे असतील, तर लोकांना शिक्षण दिले पाहिजे. शिक्षण हाच राष्ट्रनिर्मीतीचा एकमेव मार्ग आहे. समाज परिवर्तनाचा गाडा, गरिबी, बेकारी, निरक्षरता, आर्थिक, सामाजिक विषमता, स्त्री—शूद्रांवरील अन्याय, वेठबिगारी इत्यादी दृष्टचक्रात अडकून बसला आहे. त्याची सोडवणूक झाली, तरच उज्ज्वल भारताची उभारणी होईल.

देशाच्या उभारणीसाठी युवकांची चळवळ उभारणे गरजेचे आहे. युवकांकडे ऊर्जेचा प्रचंड स्त्रोत आहे. ही उर्जा समाजविकासाच्या विधायक कार्यासाठी उपयोगात आल्यास तिचे सार्थक होईल. ‘सामर्थ्य आहे चळवळीचे जो करेल तयाचे‘‘ या उक्तीप्रमाणे समाजातील युवकांनी नि:स्वार्थी वृत्तीने धडाडीने, चिकाटीने व एकमेकांच्या सहकार्याने राष्ट्राला संपन्नतेच्या मार्गावर आणण्यास हातभार लावला, तर समाजाची, राष्ट्राची देदीप्यमान प्रगतीकडे वाटचाल होईल. विवेकानंदांचा भर युवा पिढीतील क्रियाशिलतेवर होता. युवक हीच राष्ट्राची संपत्ती आहे. त्याग व सेवा हेच आपले राष्ट्रीय आदर्श मानून युवकांनी त्याचा अंगीकार करावा. आपल्या सर्व शक्तीनिशी आपल्या उद्दिष्टांचा पाठपुरावा करावा. कल्पनाविलासात रमण्यापेक्षा सत्यात उतरा. आपला हिंदुस्थान वैभवशाली करायचा असेल,

तर संघटन करणे, शक्ती संपादन करणे व सर्वांच्या इच्छाशक्तीने कार्य करणे हीच राष्ट्र विकासाची गुरूकिल्ली आहे.

देशाच्या विकासासाठी दुर्दम्य इच्छाशक्तीची गरज आहे. अनंत बल, उत्साह व धैर्य असेल तर महान कार्य घडविता येते. स्वत:वर, स्वत:च्या शक्तीवर आपणास पूर्ण विश्वास असावा. दुर्बलता हा आपला शत्रू मानावा व सतत प्रयत्न राहून संघर्षरत राहावे, हा दिव्य संदेश त्यांनी दिला. ते म्हणत, ''उठा जागे व्हा, जोपर्यत ध्येय प्राप्ती होत नाही, तोपर्यत सतत चालत रहा. ''स्वामींचा हा संदेश खरच प्रेरणादायीच आहे. मरगळलेल्या भारतीयांत अभूतपूर्व शक्तीचा, उत्साहाचा संचार करून स्वामीनी राष्ट्र उभारणीसाठी सुयोग्य वातावरण निर्माण केले.

पाश्चात्य देशातील विज्ञान तंत्रज्ञान प्रगती यांची त्यांनी वाहवा केली. आपल्या देशातही या प्रकारची क्रांती व्हावी, यासाठी त्यांनी युवकांना प्रेरित केले. विज्ञाननिष्ठ प्रगतीच्या पथावर भारतास आणणे हे त्यांनी ओळखले व त्यानुसार विज्ञानवादी कास धरून आपल्या विचारातून या आधुनिक विचाराचा प्रसार प्रचार केला. स्वामी विवेकानंद महान देशभक्त, उत्तम वक्ते, विचारवंत, लेखक व अध्यामिक विज्ञानाचे पुरस्कर्ते होते. पंडित जवाहरलाल नेहरूंनी त्यांच्या अध्यात्मिक व आधुनिक विचार प्रणालीचा गौरव केला.महात्मा गांधींनीही देशप्रेमाची प्रेरणा स्वामी विवेकानंदांपासून मिळत राहिल. असे सांगितले आहे युवकांचे प्रेरणास्थान, उत्तम संघटक, विज्ञाननिष्ठ अध्यात्मिक विचारवंत अशा अनेक अंगानी राष्ट्र उभारणीस त्यांनी स्वत:ला समर्पित केले. त्यांच्या उच्च, उदात्त विचारांची शिकवण आजच्या संभ्रमित, विस्कळीत झालेल्या युवकांना, समाजाला, राष्ट्राला दिशादर्शक ठरेल, आपले ज्ञानचक्षू सतत उघडे ठेवून आधुनिक विज्ञान व प्राचीन अध्यात्म याकडे सजग दृष्टीने पाहण्याची आज निकड आहे. समाजातील हीन प्रवृत्तीशी अखंड लढा देऊन अविरत झुंज, अविश्रांत प्रयत्नांचे आपण राष्ट्रास उन्नत अवस्था प्राप्त करून देऊ शंकु. भारताचा भावी काळ पूर्वीपेक्षाही अधिक तेजस्वी उज्ज्वल घडवायचा असेल, तर स्वामी विवेकानंदांचे संदेश, त्यांचे विचार विद्यमान काळाच्या संदर्भात अन्वर्धक आहे.

राष्ट्रांपुढील नवनवीन आव्हाने पार पाडण्यासाठी देशाला स्वामी विवेकानंदाच्या विचारांच्या अनुकरणाशिवाय पर्याय नाही. जगाचे नेतृत्व

करण्याची क्षमता भारतात निर्माण व्हावी, यासाठी विवेकानंदांच्या विचारांची आवश्यकता आहे. अन्यथा केवळ वल्गनाचे धनी होण्यासाठी दुसरा पर्याय उरणार नाही.